# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २५/९ /२०२२

## गोषवारा

प्रकरण क्र. ८४ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौ.फु. सदनिकांचे मालमत्ता कर माफ करणे बाबत.

संदर्भ :- १) सन्मा. महापौर श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांचे दि. १३/०१/२२ रोजीचे पत्र.
२) विविध पक्षांचे सन्मा. लोकप्रतिनिधींचे पत्र.

महाराष्ट्र शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौ.फु. पर्यंतच्या मालमत्तांचे मालमत्ता कर माफ करण्याचा निर्णय घेतला असून त्याच धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौ.फु. पर्यंतच्या मालमत्तांचे मालमत्ता कर माफ करणे बाबत विविध पक्षांचे सन्मा. लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेली आहे.

सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत एकुण ३,४८,४५१ मालमत्ता आहेत. त्यापैकी २,९४,४४२ निवासी मालमत्ता असुन ५४,००९ बिगर निवासी मालमत्ता आहेत. या मालमत्तांची चालु अधिक थकबाकी अनुक्रमे १५२ कोटी व १३२ कोटी अशी एकुण मागणी रक्कम रु. २८४ कोटी आहे.

यापैकी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ५०० चौ.फु. पर्यंतच्या एकुण २,७७,८८५ मालमत्ता आहेत. त्यापैकी २,३०,४२७ निवासी मालमत्ता व ४७,४५८ या बिगर निवासी मालमत्ता आहेत. या निवासी मालमत्तांची थकबाकी अधिक चालू अशी एकूण मागणी ही रु. १६४ कोटी इतकी आहे. या ५०० चौ.फु. पर्यंत क्षेत्रफळ असलेल्या निवासी मालमत्तांची संख्या ही एकुण मालमत्तेच्या ६६ टक्के इतकी आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने ५०० चौ.फु. खालील निवासी मालमत्तांकरीता कर माफी केल्यास वार्षिक रु. १०९ कोटी ने उत्पन्न कमी होणार आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १३२ अन्वये केवळ मृतांची विल्हेवाट लावणेकरीताच्या ईमारती, सार्वजनिक पुजा-अर्चा व सार्वजनिक धर्मदाय प्रयोजनाच्या ईमारतीच्या मालमत्तांना मालमत्ता कराच्या सामान्य करात सवलत देण्याची तरतुद आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हि "ड" वर्ग महानगरपालिका आहे. मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत हे फारच मर्यादीत आहेत. मालमत्ता कर हे उत्पन्नाचे मुळ व प्रमुख स्त्रोत आहे. सदर ५०० चौ. फुटापर्यंत घरांचे मालमत्ता कर माफ केल्यास या महानगरपालिकेस आस्थापना खर्च, विकासाचे प्रकल्प, साफसफाई, वैद्यकीय, उद्यान इत्यादी साठी येणारा खर्च भागविणे अवघड होईल.

नजिकच्या इतर महानगरपालिकेची तुलना केली असता इतर महानगरपालिकेस उत्पन्नाचे अन्य साधन जास्त आहेत. त्यांचे मुदत ठेवी व इतर उत्पन्न जास्त असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेची त्यांच्याशी तुलना होऊ शकत नाही.

सबब, वरील प्रमाणे वस्तुस्थितीचा विचार करता, ५०० चौ.फु. पर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफी दिली तर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार असल्याने सद्यस्थितीत कर माफी देणे उचित नाही.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका